Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)

VOL- IX | ISSUE- III | MARCH | 2022 | PEER REVIEW e-JOURNAL | IMPACT FACTOR 7.331 | ISSN 2349-638x

# नांदेड जिल्ह्यातील अंगणवाडी केंद्रांचा अभ्यास

**डॉ. पतंगे एस. एस.**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
बहिर्जी स्मारक महाविद्यालय, वसमत.

**पाटील एस.जी.**
संशोधक विद्यार्थी,
स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड

**सारांश (Abstract) :**

आय. सी.डी.एस. हा उपक्रम बालकांना पोषण, आरोग्य व शिक्षण उपलब्ध करुन देणारा आणि गरोदर महिला व स्तनदा मातांच्या आरोग्याकडे लक्ष्य देऊन ते साध्य करणारा महत्त्वाचा व प्रभावशाली उपक्रम आहे. बालकांना शाळेत प्रवेश देऊन त्यांच्यात अभ्यासाबाबत आवड निर्माण करून पूर्व प्राथमिक शिक्षण देण्यात या उपक्रमाचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. हा उपक्रम पूर्णपणे उपयोगात आणून जास्तीत जास्त लाभार्थ्यांना लाभ मिळवून देण्याचा प्रयत्न आय.सी.डी.एस. योजना आणि अंगणवाडी केंद्र करीत आहेत. त्यामुळे सदरील संशोधन लेखात महाराष्ट्र व नांदेड जिल्ह्यातील अंगणावाडी केंद्राचा अभ्यास करण्यात आला आहे.

**प्रस्तावना :**

एकात्मिक बालविकास सेवा योजना २ ऑक्टोबर १९७५ पासून अमरावती जिल्ह्यातील धारणी या आदिवासी व मुंबई येथील धारावी या नागरी प्रकल्पाच्या स्थापनेपासून झाली. आय.सी.डी.एस. या उपक्रमांतर्गत मुख्य लाभार्थीना पूरक पोषण आहार, लसीकरण, आरोग्य तपासणी, संदर्भ सेवा, पोषण व आरोग्य शिक्षण, बाल्यावस्थेत देखभाल व पूर्व शालेय शिक्षण इत्यादी सेवा पुरविल्या जातात. त्याशिवाय इतर सहाय्यक सेवा उदा. शुध्द पेय, स्वच्छ पाणी, पर्यावरण सफाई, महिला विकास व शैक्षणिक सुविधा इत्यादी उपलब्ध करुन दिल्या जातात. या सेवा गरीब वर्गापर्यंत पोहचविण्यासाठी अंगणवाडी सेविका जनतेचे सहकार्य मिळवण्याचा अधिकाधिक प्रयत्न करीत असते.

**अध्ययनाची उद्दिष्ट्ये :**

१. महाराष्ट्रातील अंगणवाडी केंद्रांचा थोडक्यात आढावा घेणे.
२. नांदेड जिल्ह्यातील विविध तालुक्यातील अंगणवाडी केंद्राचा अभ्यास करणे.

**संशोधन पध्दती :**

सदरील संशोधन लेख लिहण्यासाठी संदर्भग्रंथ, वार्षिक अहवाल, आर्थिक पाहणी अहवाल, मासिक प्रगती अहवाल, संशोधन लेख इ. व्दितीय स्त्रोतांचा वापर करण्यात आलेला आहे.

**अंगणवाडीचा अर्थ :**

अंगणवाडी ही आपल्या गावातील अंगणातच बालकांची देखभाल आणि खेळाचे एक केंद्र आहे. अंगणवाडीच्या माध्यमातून ग्रामीण, शहरी, आदिवासी क्षेत्रातील आई—मुले यांना जागच्या जागी विनामूल्य सेवा दिली जाते. तसेच बालकल्याणकारी योजना राबविणारे केंद्र आहे.' बाल अवस्थेतील प्रारंभिक वर्षे अत्यंत महत्त्वपूर्ण असल्यामुळे ६ वर्षाखालील बालकांना ही सेवा देण्यात येते. या वयात शारीरिक, मानसिक व सामाजिक विकास होत असतो. खरे तर दुसऱ्या वर्षापर्यंत बालकांच्या मानव मस्तिष्कचा अधिकाधिक विकास होत असतो. बालकांच्या सर्वांगीण विकासात मातांची

मुख्य भूमिका असते. म्हणून आय. सी. डी. एस. कार्यक्रमाचा लाभ १५ ते ४५ वयापर्यंतच्या महिलांना दिला जातो.

लहाण बालकांचे पूर्व प्राथमिक शिक्षण, आरोग्य आणि पोषण आहार या सेवा पुरविण्यासाठी एकिकृत बालविकास सेवा योजनेच्या अंतर्गत अंगणवाडीची स्थापना करण्यात आली. ६ वर्ष वयाखालील बालके, गर्भवती महिला, स्तनदामाता आणि किशोरवयीन महिलांना सेवा प्रदान करणारे अंगणवाडी हे एक केंद्र आहे.

**अंगणवाडीचा उद्देश :**

१. ० ते ६ वर्षे वयोगटातील मुलांचा पोषण आहार विषयक व आरोग्य विषयक दर्जा सुधारणे.
२. मुलांचा योग्य मानसिक, शारीरिक व सामाजिक विकासाचा पाया मजबूत करणे.
३. बाल मृत्यू, मुलांचा रोगटपणा व कुपोषण, शाळेतील गळती यांचे प्रमाण कमी करणे.
४. मातांना पोषण आहार आणि आरोग्य शिक्षण देऊन मुलांचे सर्वसाधारण आरोग्य आणि पोषण आहार या संबंधीच्या गोष्टींची त्या अधिक चांगली काळजी घेऊ शकतील अशा प्रकारे त्यांची क्षमता वाढविणे.
५. बालविकासास चालना मिळावी म्हणून विविध खात्यांमध्ये धोरण व अंमलबजावणी या बाबत प्रभावी समन्वय घडवून आणणे.

**अंगणवाडी सुरू करण्यासंबंधीचे मापदंड:**

अंगणवाडीची स्थापना करण्यासाठी ग्रामीण व शहरी भागात किमान ४०० ते ८०० लोकसंख्या असणे अनिवार्य आहे. लोकसंख्येच्या प्रमाणात एका ग्रामपंचायती अंतर्गत एक किंवा एका पेक्षा जास्त अंगणवाडीची स्थापना करता येते. आदिवासी क्षेत्राअंतर्गत १५० ते ३०० लोकसंख्या असलेल्या गावात अंगणवाडीची स्थापना करता येते.

**महाराष्ट्रातील अंगणवाडी केंद्रांचा आढावा :**

ग्रामीण, आदिवासी व झोपडपट्टी भागातील शालेयपूर्व बालकांची योग्य वाढ व विकास साधण्यासाठी एकात्मिक पध्दतीने सेवा पुरविणे हे एकात्मिक बालविकास सेवा योजनेचे उद्दिष्ट आहे. २००५ पर्यंत महाराष्ट्रात २६५ ग्रामीण, ४० आदिवासी व ६२ नागरी असे एकूण **३६७** प्रकल्प कार्यान्वित केले होते. जनतेचा वाढता सहभाग आणि गरज लक्षात घेऊन पुन्हा प्रकल्पांची संख्या वाढविण्यात आली आहे. मार्च २००७ पर्यंत असलेल्या प्रकल्पांची व अंगणवाडींची संख्या पाहता २७९ ग्रामीण, ५९ आदिवासी व ७८ नागरी असे एकूण ४१६ कार्यरत प्रकल्प होते तर २०१२ पर्यंत ३६४ ग्रामीण, ८५ आदिवासी व १०४ नागरी असे एकूण ५५३ कार्यरत प्रकल्प आहेत. ९५६४८ अंगणवाडी केंद्र व १००४६ मिनी अंगणवाडी केंद्र अशी एकुण अंगणवाडी केंद्राची संख्या **१,०५,६९४** आहे.

राज्यात २००१ च्या जनगणनेनुसार १३१८७०८७ एवढी ६ वर्षाखालील बालकांची संख्या आहे. त्यापैकी ८० लाख बालकांना आय.सी.डी.एस. योजनेचा लाभ मिळाला होता. राज्यात २०११ च्या जनगणनेनुसार १,२८,४८,३७५ एवढी ६ वर्षाखालील बालकांची संख्या आहे. त्यापैकी ८१,८०,५९५ बालकांना आय.सी.डी.एस. योजनेचा लाभ मिळाला आहे. तर १५६५९२० एवढ्या गरोदर व स्तनदा माता लाभार्थी होत्या. मे २०१२ च्या मासिक प्रगती अहवालानुसार ३ ते ६ वर्ष वयोगटातील १८८८५४४ ग्रामीण, ४६८२६७ आदिवासी आणि ५४७२९९ नागरी असे एकुण २९०४११० बालके शाळापुर्व शिक्षणाचे लाभार्थी होते.

महाराष्ट्रामध्ये ३५ अंगणवाडी कर्मचारी प्रशिक्षण केंद्र व ४ मध्यस्तरीय प्रशिक्षण केंद्र आहेत. महाराष्ट्रात बालविकास प्रकल्प अधिकारी मंजूर पदे ५५३ व कार्यरत ४४२ असुन रिक्त पदांचे प्रमाण २०.०७ टक्के आहे. सहाय्यक बालविकास प्रकल्प अधिकारी मंजूर पदे ९४ व कार्यरत ९४, पर्यवेक्षिका मंजूर पदे ३८९८ व कार्यरत ९४ असुन रिक्त पदांचे प्रमाण १६.६८ टक्के, अंगणवाडी सेविकांची मंजूर पदे ९७४६२ व कार्यरत ९३२९४ असुन रिक्त पदांचे प्रमाण ४.२८ टक्के, मिनी अंगणवाडी सेविकांची मंजूर पदे १०९०१ व कार्यरत ८६९१ असुन रिक्त पदांचे प्रमाण २०.५८ टक्के, अंगणवाडी मदतनीसची मंजूर पदे ९७४६२ व कार्यरत ८९५१० असुन रिक्त पदांचे प्रमाण ८.१५ टक्के आहे.

## १. नांदेड जिल्ह्यातील अंगणवाड्या व अंगणवाडी सेविका

तक्ता क्र. १

नांदेड जिल्ह्यातील अंगणवाड्या व अंगणवाडी सेविकाची संख्या

| अ. क्र. | तालूका | अंगणवाड्यांची संख्या | | कार्यरत अंगणवाडी सेविका |
|---|---|---|---|---|
| | | **मंजूर** | **कार्यरत** | |
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | माहूर | १४५ | १२२ | ११८ |
| २ | किनवट | ३७० | २७१ | २६७ |
| ३ | हिमायतनगर | १३३ | ९९ | ९७ |
| ४ | हदगाव | २८२ | २०२ | २०२ |
| ५ | अर्धापूर | १२२ | १०२ | ९९ |
| ६ | नांदेड | ५७७ | ३३६ | ३२६ |
| ७ | मुदखेड | ९४ | ७९ | ७८ |
| ८ | भोकर | १४९ | ११२ | १०५ |
| ९ | उमरी | ९८ | ७९ | ७४ |
| १० | धर्माबाद | ९२ | ६६ | ६६ |
| ११ | बिलोली | १७० | १३८ | १३२ |
| १२ | नायगांव | १९१ | १६१ | १६१ |
| १३ | लोहा | २४८ | २४८ | २०५ |
| १४ | कंधार | २४४ | २४४ | १९५ |
| १५ | मुखेड | २८५ | २२५ | २२४ |
| १६ | देगलूर | ३४५ | ३१३ | ३०९ |
| नांदेड जिल्हा | **ग्रामीण** | **३०१०** | **२४६७** | **२३२८** |
| | **नागरी** | **५२८** | **३३३** | **३३३** |
| | **एकूण** | **३५३८** | **२८००** | **२६६१** |

स्त्रोत: जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, जिल्हा नांदेड २०११

वरील तक्तावरुन असे स्पष्ट होते की, नांदेड तालूक्यामध्ये कार्यरत अंगणवाड्या ३३६ तर अंगणवाडी सेविका ३२६ असून ते नांदेड जिल्ह्यातील इतर सर्व तालुक्यांच्या तुलनेत जास्त आहे. यामध्ये ग्रामीण १७४ तर नागरी १६२ अंगणवाड्या आहेत. त्याखालोखाल अनुक्रमे देगलूर तालुक्यामध्ये ३१३ अंगणवाड्या कार्यरत असून ३०९ अंगणवाडी सेविका कार्यरत आहेत. यामध्ये ग्रामीण १७३ तर नागरी १४० अंगणवाड्याचा समावेश आहे. तिसऱ्या क्रमांकला किनवट तालुका असून यामध्ये २७१ अंगणवाड्या कार्यरत आहेत तर २६७ एवढ्या अंगणवाडी सेविका कार्यरत आहेत.

धर्माबाद तालुक्यामध्ये ६६ अंगणवाड्या तर ६६ अंगणवाडी सेविका कार्यरत असून ह्या नांदेड जिल्ह्यातील सर्व तालक्यांमध्ये या तालुक्यात सर्वात कमी अंगणवाड्या आहेत. माहुर, हिमायतनगर, हदगांव, अर्धापूर, मुदखेड, भोकर आणि नायगाव तालुक्यामध्ये नागरी एकही अंगणवाडी कार्यरत नाही. तर किनवट ४, नांदेड १६२, उमरी ३, धर्माबाद ७, बिलोली ५, लोहा ६, कंधार ४, मुखेड २ आणि देगलूर तालुक्यामध्ये १४० नागरी अंगणवाड्या कार्यरत आहेत.

## २. नांदेड जिल्ह्यातील अंगणवाड्यांचा इमारती आणि शौचालय :

नांदेड जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन अहवाल २०११—१२ नुसार किनवट

तालुक्यामध्ये स्वमालकीच्या १७८ अंगणवाड्या असून ही संख्या नांदेड जिल्ह्यात सर्वात जास्त आहे. त्याखालोखाल अनुक्रमे मुखेड १२१, देगलूर १११, भोकर १०९, लोहा १०६ आणि हिमायतनगर १०० एवढ्या स्वमालकीच्या अंगणवाड्या आहेत. तर नायगांव तालुक्यामध्ये २१ अंगणवाड्या असून त्या जिल्ह्यात इतर तालुक्यांच्या तुलनेत कमी आहेत.

भाड्याच्या इमारतीमध्ये अंगणवाड्याची संख्या पाहिली असता नांदेड शहरामध्ये १७५ अंगणवाड्या असून त्या जिल्ह्यात सर्वात जास्त आहेत. त्याखालोखाल अनुक्रमे देगलूर १४६, हदगांव ६० आणि लोहा तालुक्यामध्ये ३३ अंणवाड्या भाड्याच्या इमारतीमध्ये भरतात. तर माहुर, हिमायतनगर, मुदखेड आणि भोकर तालुक्यामध्ये एकही अंगणवाडी भाड्याच्या इमारतीमध्ये भरत नाही.

तसेच जिल्ह्यातील अंगणवाड्या मधील शौचालयाची स्थितीमध्ये नांदेड शहरात ३०८ अंगणवाड्यामध्ये शौचालयाची सुविधा असून जिल्ह्यात सर्वात जास्त आहेत. त्याखालोखाल अनुक्रमे किनवट २४४, हदगांव १६०, लोहा १४९, नायगांव १३९, बिलोली १२८ आणि माहुर तालुक्यामध्ये ९८ अंगणवाड्यामध्ये शौचालयाची सुविधा आहे.

**३.नांदेड जिल्ह्यातील अंगणवाड्यामधील दाखल मुले व स्तनदा मातांची संख्या :**

नांदेड जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन अहवाल २०११—१२ नुसार नांदेड शहरात अंगणवाड्यातील दाखल मुलांची संख्या २४६६९ एवढी असून ती जिल्ह्यात सर्वात जास्त आहे. त्याखालोखाल अनुक्रमे मुखेड १५९५४, लोहा १३३४६, हदगांव १२१८१ आणि कंधार तालुक्यातील अंगणवाड्यामध्ये मुलांची संख्या १२१३७ एवढी आहे. धर्माबाद तालुक्यामध्ये अंगणवाडीत ३६२६ मुले असून ती जिल्ह्यात सर्वात कमी आहेत.

नांदेड शहरातील अंगणवाड्यामधील स्तनपान करणाऱ्या माता लाभार्थींची संख्या ३९७१ असून ती जिल्ह्यात सर्वात जास्त आहे. त्याखालोखाल अनुक्रमे मुखेड २९७९, लोहा २६२५, हदगाव २३३१ आणि किनवट २०२५ अशी तालुकानिहाय स्तनपान करणाऱ्या मातांची संख्या आहे. तर धर्माबाद तालुक्यामध्ये स्तनपान करणाना मातांची संख्या ६६६ एवढी असून ती जिल्ह्यात सर्वात कमी आहे. तसेच माहुर, हिमायतनगर, अर्धापूर, मुदखेड, भोकर, नायगांव आणि देगलूर तालुक्यामध्ये नागरी भागातील अंगणवाडीत मुले व स्तनपान करणाऱ्या मातांची संख्या आढळून येत नाही.

नांदेड जिल्ह्यातील संपूर्ण अंगणवाड्यामध्ये दाखल मुलांची संख्या १५३५१५ एवढी असून यामध्ये ग्रामीण भागातील १३७९४८ तर नागरी १५५६७ मुलांचा सहभाग आहे. तसेच जिल्ह्यात एकूण स्तनपान करणाऱ्या मातांची संख्या २८४६२ असून यामध्ये ग्रामीण २६०२४ तर नागरी भागाचा २४३८ एवढा वाटा आहे.

**४. नांदेड जिल्ह्यातील अंगणवाड्यामधील वयोगटनिहाय मुलांची संख्या :**

नांदेड जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन अहवाल २०११—१२ नुसार नांदेड शहरामध्ये ० ते १ वर्ष वयोनिहाय मुलांची संख्या ७२७७ एवढी असून ती जिल्ह्यात सर्वात जास्त आहे . त्याखालोखाल अनुक्रमे मुखेड ५९८०, लोहा ५१९०, कंधार ४५१७ आणि हृदगांव ८००५ आदी तालुक्यामध्ये ० ते १ वर्ष वयोगटनिहाय मुलांची संख्या आहे. तर धर्माबाद तालुक्यामध्ये ० ते १ वर्ष वयोगटनिहाय मुलांची संख्या १३१४ असून ती जिल्ह्यात सर्वात कमी आहे.

१ ते ३ वर्ष वयोगटनिहाय मुलांची संख्या नांदेड शहरात १५११५ एवढी असून ती जिल्ह्यात सर्वात जास्त आहे. त्याखालोखाल

अनुक्रमे मुखेड १०७३३, लोहा ९८०१, कंधार ८६१८ आणि हदगांव तालुक्यामध्ये ८५०४ एवढी संख्या आहे. धर्माबाद तालुक्यामध्ये २४९४ एवढी मुलांची संख्या असून ती जिल्ह्यात सर्वात कमी आहे.

३ ते ६ वर्ष वयोगटनिहाय मुलांची संख्या नांदेड शहरात २४५८९ एवढी असून ती जिल्ह्यात सर्वात जास्त आहे. त्याखालोखाल अनुक्रमे मुखेड १५९५४, लोहा १३३४७, हदगांव १२१८१ आणि कंधार तालुक्यामध्ये १२१४७ एवढी संख्या आहे. धर्माबाद तालुक्यामध्ये ३६२६ एवढी मुलांची संख्या असून ती जिल्ह्यात सर्वात कमी आहे.

० ते ६ वर्ष वयोगटातील एकूण मुलांची संख्या नांदेड शहरात ४६९८१ एवढी असून ती जिल्ह्यात सर्वात जास्त आहे. त्याखालोखाल अनुक्रमे मुखेड ३२६६७, लोहा २८३३८, हदगांव २५१५८ आणि किनवट तालुक्यामध्ये २३६४२ एवढी मुलांची संख्या आहे. तर धर्माबाद तालुक्यामध्ये ७४३४ एवढी मुलांची संख्या असून ती जिल्ह्यात सर्वात कमी आहे.

**५. नांदेड जिल्ह्यातील अंगणवाड्यामधील बालकांची जन्म व मृत्यू नोंदीची आकडेवारी:**

नांदेड जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन अहवाल २०११—१२ नुसार, कंधार तालुक्यामध्ये अंगणवाडीतील बालकांच्या जन्मनोंदीची संख्या ६४०५ एवढी असुन ती जिल्ह्यामध्ये सर्वात जास्त आहे. या खालोखाल अनुक्रमे नांदेड शहर ६११२, मुखेड ५८८२, लोहा ४ आणि नायगांव तालुक्यामध्ये ३६०९ एवढी जन्मलेल्या बालकांची नोंद झाली आहे. तर धर्माबाद तालुक्यामध्ये ११२० मुलांची नोंद झाली असून ती जिल्ह्यात सर्वात कमी आहे.

बालमृत्यूचे प्रमाण पाहता बिलोली तालुक्यांमध्ये ३१ बालकांचा मृत्यू झाला असून ते जिल्ह्यांत संख्येने जास्त आहे. त्याखालोखाल अनुक्रमे लोहा २८, कंधार २६, नांदेड २४ आणि किनवट २४ या प्रमाणात बालमृत्यू झाले आहेत. तर उपजत बालमृत्यूचे प्रमाण पाहिले तर कंधार ६५, हिमायतनगर ४८, नायगांव ४६, मुखेड ४५ आणि किनवट ४२ आदि तालुक्यांमध्ये उपजत बाल मृत्यू झालेले आहेत. संपूर्ण नांदेड जिल्ह्यामध्ये ५१९२७ बालकांची नोंदणी केली असून त्यापैकी २६२ जणांचा मृत्यू झाला आहे तर ५२४ बालकांचा उपजत मृत्यू झाल्याचे दिसून येते.

**६.नांदेड जिल्ह्यातील अंगणवाड्यामधील बालमृत्यू दर :**

नांदेड जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन अहवाल २०११—१२ नुसार असे दिसून येते की, बिलोली तालुक्यामध्ये ११.२० टक्के बालमृत्यू दर असून हे जिल्ह्यात सर्वात जास्त प्रमाण आहे. त्याखालोखाल अनुक्रमे मुदखेड ७.७६, हदगांव ७.२१, किनवट ६.८८ आणि धर्माबाद ६.२५ इत्यादी तालुक्यांमध्ये बालमृत्यूचे प्रमाण दिसून येते. तर अर्धापूर तालुक्यामध्ये ०.४७ टक्के बालमृत्यू पावले असून हे प्रमाण जिल्ह्यात सर्वात कमी आहे.

**७.नांदेड जिल्ह्यातील अंगणवाड्यामधील बालकांचे कुपोषण :**

नांदेड जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन अहवाल २०११—१२ नुसार असे दिसून येते की, नांदेड शहरात ४५०५० मुलांनी वजन केले असून ते जिल्ह्यात सर्वात जास्त आहे. त्याखालोखाल अनुक्रमे मुखेड ३०७९७, लोहा २७१०८, हदगांव २४४९६ आणि कंधार २४२४७ एवढ्या मुलांनी वजन केले आहे.

वजन केलेल्या मुलांचे प्रमाण पाहता किनवट तालुक्यातील ९८.६१ टक्के मुलांचे वजन केले असून ते जिल्ह्यात सर्वात जास्त आहे. त्याखालोखाल हिमायतनगर ९८.०३ टक्के, नायगांव ९७.५७ टक्के, हदगांव ९७.३७ टक्के आणि भोकर ९७.०५ टक्के मुलांचे वजन केले आहे. तर कंधार तालुक्यामध्ये ८८.५०

टक्के मुलांचे वजन केले असून ते जिल्ह्यात सर्वात कमी आहे.

नांदेड शहरात ९३३५ मुले ही मध्यम व कमी वजनाची असून ते जिल्ह्यात सर्वात जास्त आहेत. त्याखालोखाल मुखेड ६२६१, कंधार ५०५१, किनवट ४६५१ आणि नायगांव ४१०४ इत्यादी तालुक्यांमध्ये मध्यम कमी वजनाची मुले आहेत.

तीव्र कमी वजनाची नांदेड शहरात ९४८ मुले असून ती जिल्ह्यात सर्वात जास्त आहेत. त्याखालोखाल अनुक्रमे किनवट ५९४, कंधार ४९५, मुखेड ४७३ आणि हदगांव ४६३ आदि तालुक्यात मुलांचे वजन हे तीव्र कमी स्वरुपाचे आहे.

मध्यम कमी वजनाच्या मुलांचे प्रमाण पाहता बिलोली तालुक्यामध्ये २२.७२ टक्के असून ते जिल्ह्यात सर्वात जास्त आहे. त्याखालोखाल अनुक्रमे भोकर २२.५५ टक्के, हिमायतनगर २२.०३ टक्के, उमरी २१.६१ टक्के आणि मुदखेड २०.७३ टक्के प्रमाण आहे.

तर तीव्र कमी वजनाचे प्रमाण पाहता किनवट तालुक्यामध्ये २.५१ टक्के असून ते जिल्ह्यात सर्वात जास्त आहे. त्याखालोखाल अनुक्रमे माहुर २.४७ टक्के, मुदखेड २.२८ टक्के, उमरी २.१८ टक्के आणि नायगांव २.०२ टक्के मूले तीव्र कमी वजनाची आहेत.

एकूण जिल्ह्याचा अभ्यास केला असता ३००२४९ एवढ्या मुलांचे वजन केले असून त्यांचे शेकडा प्रमाण ९०.०९ टक्के एवढे आहे. मध्यम कमी वजनाची मुले ६०००७ एवढी असून त्यांचे शेकडा प्रमाण १८.९८ टक्के एवढे आहे. तर तीव्र कमी वजनाची मुले ६००४ एवढी असून त्यांचे शेकडा प्रमाण १.८९ टक्के एवढे आहे.

**निरीक्षणे :**

१. महाराष्ट्रात २०१२ पर्यंत ३६४ ग्रामीण, ८५ आदिवासी व १०४ नागरी असे एकूण ५५३ कार्यरत प्रकल्प असुन अंगणवाडी केंद्राची संख्या १,०५,६९४ आहे.
२. नांदेड जिल्ह्यात २८०० कार्यरत अंगणवाड्या असुन यात ग्रामीण २४६७ तर नागरी ३३३ अंगणवाड्याचा समावेश आहे. तसेच २६६१ एवढ्या कार्यरत अंगणवाडी सेविका आहेत.
३. जिल्ह्यामध्ये २८०० अंगणवाड्या कार्यरत असून त्यापैकी १२७४ अंगणवाड्यांना शासनाची इमारत आहे. तर ४२५ अंगणवाड्या भाड्याच्या इमारतीमध्ये भरतात तसेच जिल्ह्यातील २८०० कार्यरत अंगणवाड्यापैकी १८६० अंगणवाड्यांना शौचालयाची सुविधा आहे.
४. नांदेड जिल्ह्यातील ० ते ६ वर्ष वयोगटनिहाय एकूण ३१६०८६ एवढी मुलांची संख्या असून यामध्ये ० ते १ वर्षाच्या आतील ५६१२०, १ ते ३ वर्षाच्या आतील १०५८०० आणि ३ ते ६ वर्ष वयोगटातील १५४१६६ एवढी मुलांची संख्या आहे.
५. तीव्र कमी वजनाची नांदेड शहरात ९४८ मुले असून तीव्र कमी वजनाचे प्रमाण किनवट तालुक्यामध्ये २.५१ टक्के आहे. बिलोली तालुक्यामध्ये बालमृत्यू दर ११.२० टक्के आहे.

**सारांश:**

आज अंगणवाड्या छोट्या—छोट्या गावात पोहोचल्यामुळे बालक, स्तनदा किंवा गरोदर महिलांचे प्राथमिक उद्दिष्टे साध्य करण्यात शासनाला बऱ्यापैकी यश आले आहे. अंगणवाडी सेविका गावपातळीवर समाजोपयोगी विविध जबाबदाऱ्या पार पाडत असल्यामुळे तिच्याकडे समाजदूत म्हणून पाहिले जाते. गावातील सर्वच महत्त्वाच्या सेवा या अंगणवाडी

केंद्रांच्या माध्यमातूनच चालविल्या जातात. त्यामुळे केंद्र आणि राज्य शासनाकडून विविध सेवा योजनांची अंमलबजावणी करण्याचे केंद्र म्हणून अंगणवाडी केंद्राला पाहिले जात आहे. त्यामुळे दिवसेंदिवस अंगणवाडी केंद्रांचे महत्त्व वाढताना दिसून येते आहे.

**संदर्भसुची:**


१. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०१६—१७, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई.
२. डॉ. किरण देसले, स्पर्धा परीक्षा अर्थशास्त्र—२ आर्थिक व सामाजिक विकास, दीपस्तंभ प्रकाशन, जळगाव, फेब्रुवारी २०१३.
३. जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, जिल्हा नांदेड २०११
४. जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, जिल्हा नांदेड २०१२
५. जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, जिल्हा नांदेड २०१४
६. https://icds.gov.in
७. https://mahades.maharashtra.gov.in